# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती

Email roamravati.dte@gmail.com Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913


क्रमांक :- विकाअ/आस्था/बैठक/२०१२/ ३१४२

दिनांक :- ०६/१२/२०१२

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती,
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/खामगांव/वाशिम/मुर्तीजापुर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ
प्राचार्य,डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन,अमरावती.
प्राचार्य गितादेवी खंडेलवाल इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी,अकोला

विषय : दिनांक ८.१२.२०१२ रोजी आयोजीत बैठक

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की,या कार्यालयाचे अधिपत्याखालील सर्व शासकीय व अनुदानीत संस्थांचे प्राचार्यांची सभा दिांक ८.१२.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता या कार्यालयाचे सभागृहात आयोजीत केलेली आहे. सभेमध्ये पुढील विषयावर चर्चा करण्यात येईल १.संस्थेच्या अडीअडचणी २.पदांचा फेर आढावा ३.वेळेवर येणारे अन्य विषय. तरी सर्व प्राचार्यांनी सभेकरीता वेळेवर उपस्थित रहावे.

S.P. Pasebant

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रत:
१.प्रोग्रामर,तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.
२.लघुलेखक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना माहितीकरीता.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

**E-mail :-** desk5@dte.org.in **Web :-** http://www.dte.org.in


**कार्यालयीन आदेश :**

क्रमांक.: ५(३)/पदांचा आढावा/२०१२/१३३४८

दिनांक : ५ डिसेंबर २०१२

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अनुदानित पदविका संस्थांतील पदांचा फेर आढावा घेण्याबाबत....**

शासनाच्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक असंक-१००१/प्रक्र२९/२००१/वित्तीय सुधारणा दिनांक १० सप्टेंबर, २००१ मधील तरतुदींनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रशासकीय कार्यालये तथा सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थांतील सन २०००-२००१ पर्यंतच्या चालविण्यांत येणा-या अभ्यासक्रमानुसार मंजूर पदांचा आढावा घेण्यांत आलेला असून आढाव्यानंतर संस्था/कार्यालयात कार्यरत पदांचा एकत्रित गोषवारा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दिनांक १-४-२००४ मध्ये नमूद करण्यांत आलेला आहे.

सदरच्या दिनांक १० सप्टेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी ३१ ऑक्टोबरपूर्वी आढावा घेण्याबाबतचेही आदेश देण्यांत आलेले आहेत. त्या अनुषंगाने सन २००१-२००२ पासून वर्ष २०१२-१३ पर्यंत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांमध्ये नव्याने सुरु करण्यांत आलेल्या अभ्यासक्रमासाठी तसेच काही अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ केल्यामुळे अतिरिक्त नवीन पदे निर्माण करणे आवश्यक असल्याने त्याचप्रमाणे जे अभ्यासक्रम बंद झालेले आहेत किंवा ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट झालेली आहे. अशा अभ्यासक्रमासाठी मंजूर असलेल्या पदांना अतिरिक्त ठरविणे आवश्यक असल्याने सदर संस्थांतील पदांचा आढावा पुन्हा नव्याने घेणे आवश्यक असल्याने या संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांतील पदांचा आढावा घेण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांप्रमाणे संबंधित संस्थांतील पदे निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती गठित करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. सुभाष महाजन | प्र.संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई | --अध्यक्ष |
| २) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रतिनिधी | | -- सदस्य. |
| ३) श्री. दयानंद मेश्राम, | सहसंचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई | -- सदस्य |
| ४) सबंधित विभागाचे सहसंचालक | | -- सदस्य |
| ५) संबधित संस्थेचे प्राचार्य | | --सदस्य |
| ६) श्री. द.श्री.कुकडे | प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण, म.रा. मुंबई | --सदस्य सचिव |

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद व नागपूर अधिनस्त संस्थासाठी सदर समितीची बैठक **दि. १५ डिसेंबर, २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय तंत्रनिकतन, नागपूर** येथे आयोजित करण्यात येत असून सदर बैठकीस सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद व नागपूर यांनी तसेच या तीन विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थाच्या प्राचार्यांनी माहितीसह उपस्थित रहावे.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

प्रतिः सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,औरंगाबाद व नागपूर

प्रतः-.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना असे कळविण्यात येते की, सदर बैठक आयोजित करण्याचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी. आपल्या स्तरावर जबाबदार अधिका-यांची नियुक्ती करुन संबधितांशी संपर्क करुन उपस्थितीची निश्चिती करुन घेण्यात यावी.

\\Dtens1\minister_ppt\Mali-letter-2012.doc

पृ. क्र. विक्षाअ/आस्था/आढावा/२०१२/३९८३
दिनांक :- ०६/१२/२०१२

प्रतिलिपी :-

प्राचार्य, शा. तंत्रनिकेतन अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशीम/मुर्तीजापूर
मि. महिला तंत्रनिकेतन यवतमाळ, प्राचार्य डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन अमरावती
सिताबाई खंडेलवाल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मसी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता. यांनी दि. १५/१२/२०१२ रोजी नागपूर येथे आयोजीत बैठकीला माहितीसह उपस्थीत रहावे.

S D. Pasbar

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती

Email roamravati.dte@gmail.com Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913


क्रमांक :- विकाअ/आस्था/आवक/२०१२/३७७६

दिनांक :- 06/12/2012

प्रति,

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती,

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/खामगांव/वाशिम/मुर्तीजापुर

शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ

विषय : विधान मंडळाच्या दिनांक १०.१२.२०१२ पासुन नागपुर येथे सुरु होणा-या हिवाळी अधिवेशनासाठी विधान मंडळ कामकाजाशी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, दिनांक १०.१२.२०१२ पासुन नागपुर येथे विधान मंडळाचे अधिवेशन सुरु होत असुन अधिवेशन काळात विधानसभा/विधानपरिषद सभागृहात उपस्थित केल्या जाणा-या मुददयांची अचुक माहिती वेळीच पुरविणे आवश्यक असते.करीता अधिवेशन काळात सभागृहात उपस्थित केलेले प्रश्न,लक्षवेधी सुचनांची मागीतलेली माहिती त्वरीत व बिनचुक पाठविण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी. तसेच मागीतलेली माहिती पुरविण्यासाठी कार्यालयीन वेळेनंतर उशिरापर्यंत कार्यालयात जबाबदार अधिकारी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी अधिवेशन कामकाज हाताळण्यासाठी अधिका-यांची नियुक्ती करुन त्यांना अधिवेशनाचे कामकाज संपेपर्यंत कार्यालयात उशिरापर्यंत थांबण्याबाबत सुचना दयाव्यात. तसेच अधिवेशनाचे कामकाजाकरीता नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांची नावे या कार्यालयास कळविण्यात यावीत.तसेच अधिवेशन काळात अधिकारी/कर्मचारी यांनी आपले मुख्यालय सोडु नये.

S.P. Pusdekar

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रत: प्रोग्रामर,तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.